# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २२३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.०४ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## अमेरिकेचा इराणवर हल्ला; लष्कराचे तीन पायलट ठार

वॉशिंग्टन दि.३ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध संघर्ष दिवसेंदिवस आणखी तीव्र होताना दिसत आहे. अमेरिकेने १ सप्टेंबर रोजी इराणवर मिसाईल डागल्या. या हवाई हल्ल्यात इराणला तीन पायलट गमवावे लागले आहेत. त्याचबरोबर लग्नाच्या ठिकाणी केलेल्या हल्ल्यात पाच जण मारले गेले आहेत. अमेरिकेच्या हल्ल्यामुळे इराणचे मोठे नुकसान झाले आहे. यात इराणच्या तीन लष्करी वैमानिकांचा मृत्यू झाला आहे. अमेरिकेने इराणवर हल्ल्यांची नवीन मालिका सुरू केल्यानंतर इराणसाठी हा एक मोठा धक्का मानला जात आहे. इराणी प्रसारमाध्यमांनी गुरुवारी दिलेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी झालेल्या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात इराणचे तीन लष्करी वैमानिक मारले गेले. मोजतबा बघेरी आणि हामिद ओकाती (इराणी नौदलाचे वैमानिक) तसेच हुसैन महदावियन (इराणी हवाई दलाचे वैमानिक) अशी या मृत वैमानिकांची नावे आहेत. हल्ल्याचे नेमके ठिकाण, हल्ल्यात वापरण्यात आलेली विमाने किंवा वैमानिकांचा मृत्यू नेमक्या कोणत्या परिस्थितीत झाला, याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. तसनीम न्यूज या वृत्त संस्थेने ही माहिती दिली आहे. अल जजिराने दिलेल्या वृत्तानुसार इराणचे उपराष्ट्रपती म्हणाले की, अमेरिकेने इराणच्या सुरक्षा आणि संरक्षणाशी संबंधित धोरणे बदलली आहेत. त्यांनी इशारा दिला आहे की इराणचे उत्तर अमेरिकेच्या अपेक्षेपेक्षा कितीतरी पटीने वेगळे असेल. मोहम्मद रझा अरेफ यांनी वर (ट्विटर) लिहिले आहे की, ‘‘अमेरिकेने आतापासूनच पेट्रोल आणि इंधनाचा साठा करण्यास सुरुवात केली पाहिजे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी येणारे दिवस अत्यंत कठीण असणार आहेत.‘‘

# नाते, रक्ताचे नाते अन् कुळ.... सरकार कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी तयार

## मंत्र्यांच्या शिष्टमंडळाची शिष्टाई कामाला, जरांगेंचे मराठा समाजाला आवाहन

जालना दि.३ (प्रतिनिधी)- गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणाला सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचं चित्र आहे. राज्य सरकारच्या मंत्र्यांची शिष्टाई कामाला आली असून उद्यापासून (४ सप्टेंबर) कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचं आवाहन मराठा समाजाला करण्यात आलं आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांनी नातं, रक्ताचं नातं आणि कुळ या मुद्द्यांच्या आधारे अर्ज करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

हैदराबाद गॅझेटनुसार ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटीसाठी अर्ज करण्याचं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे. ५ सप्टेंबर पर्यंत ग्रामपंचायतींमध्ये नोंदीची यादी लावण्यात येणार आहे. कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी नेमण्यात येणार असून त्यामध्ये काही अडचणी आल्या तर जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क



साधण्याचं आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं. मराठा समाज्याच्या ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटी देण्यासोबत इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे हे गेल्या सहा दिवसांपासून जालन्यातील अंतरवाली सराटीमध्ये आंदोलनासाठी बसले आहेत. त्यांच्या मागण्यांवर राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या गटाने विचार केला आणि ते मनोज जरांगेंच्या भेटीला आले. या मंत्र्यांच्या शिष्टमंडळामध्ये राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, प्रसाद लाड आणि मकरंद पाटील यांचा समावेश आहे.

हैदराबाद गॅझेटनुसार ४ सप्टेंबरपासून मराठा समाजाने कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटचाही जीआर सरकारने काढावा अशी मागणी जरांगे यांनी मंत्र्यांकडे केली. मंत्रालयात आरक्षण कक्ष नको तर मराठा-कुणबी कक्ष स्थापन करा अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

कोणत्याही मराठा विद्यार्थ्याचे नुकसान होऊ देणार नाही. जात पडताळणीमुळे विलंब झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक शुल्क परत दिले जाणार, असं आश्वासन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलं. दर मंगळवारी मराठा उपसमितीची बैठक होते, त्यामध्ये मराठा समाजाचे प्रश्न सोडवले जातील, असंही विखे पाटील म्हणाले.

### उपोषणावर ठाम-जरांगे

उपोषणकर्ते मनोज जरांगे यांनी सदर शिष्टमंडळासोबत चर्चा केली असली तरी त्यातून उपोषण मागे घेण्याचा तिढा सुटलेला नाही. सरकारने जीआर काढावा. तेंव्हाच आपण उपोषण मागे घेऊ तो पर्यंत सलाईन, पाणी पिऊन आपण उपोषण करण्यावर ठाम असल्याचे जरांगे यांनी यावेळी म्हटले.

# शिवसेना पक्ष, चिन्हाबाबत न्यायालयात सुनावणी सुरु

## निकाल येण्यापूर्वी त्यावर भाष्य करणे योग्य नाही-शरद पवार

पुणे दि.३ (प्रतिनिधी)- शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या मालकी हक्काबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना निकालापूर्वी त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी त्यांनी सर्वोच्च न्यायालयातील खटला, विद्यार्थी आंदोलन, वाढती महागाई, साखर आयातीचा प्रश्न, राज्यातील दुष्काळी स्थिती, दूध भेसळ आणि मराठा आरक्षणासह विविध चालू घडामोडींवर सविस्तर भूमिका मांडली.

सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हाबाबत सुरू असलेल्या सुनावणीवर विचारले असता शरद पवार म्हणाले, ‘‘न्यायालयातील सुनावणी अजून संपलेली नाही, ती सध्या सुरू आहे. अंतिम निकाल



येण्यापूर्वी आम्ही त्यावर कोणतेही भाष्य करणे हे दोन्ही बाजूंच्या हिताचे नाही. न्यायालयाचा निकाल काय येतो, हे पाहिल्यानंतरच खरी वस्तुस्थिती स्पष्ट होईल.‘‘

विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या आणि त्यांच्या आंदोलनावर बोलताना पवारांनी राज्य सरकारच्या धोरणांवर बोट ठेवले. ‘‘विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची आणि मागण्यांची सरकारने गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. सरकारने घेतलेले धोरण कसे चुकीचे आहे, हे न्यायदेवतेने स्पष्टपणे दाखवून दिले आहे. जर तुम्ही योग्य पद्धतीने निर्णय घेतले नाहीत, तर आम्हाला हस्तक्षेप करून निर्णय घ्यावे लागतील, असा कडक इशाराच न्यायालयाने सरकारला दिला आहे,‘‘ असे पवार यांनी नमूद केले.

साखरेच्या वाढत्या दरांवर आणि केंद्र सरकारच्या आयात धोरणावर पवारांनी चिंता व्यक्त केली. ‘‘बाजारपेठेत साखरेचे दर वाढत असले तरी त्याचा थेट फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होताना दिसत नाही. खते, मशागत असा उत्पादन खर्च वाढतो आहे. त्यामुळे वाढलेल्या दरातील योग्य हिस्सा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायला हवा.‘‘ ‘‘साखरेची आयात करणे कोणत्याही दृष्टीने योग्य नाही. आयात केलेली नवीन साखर बाजारपेठेत आल्यावर स्थानिक साखर उद्योग आणि शेतकऱ्यांना त्याचा काय फटका बसेल, याचा विचार होणे गरजेचे आहे असे पवार म्हणाले.

## अकोल्याच्या पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात ३८ लाखांचा घोटाळा; ७ जणांवर गुन्हे दाखल

अकोला दि.३ (प्रतिनिधी)- अकोल्यातील प्रतिष्ठित डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात तब्बल ३८ लाख ७३ हजार रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी विद्यापीठाचे सध्याचे संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदारावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे कृषी विद्यापीठाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कृषी महाविद्यालयातील विविध कामांच्या देयकांमध्ये अनियमितता आढळल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली होती. चौकशीदरम्यान तब्बल ११५ बनावट देयके तयार करून रक्कम लाटल्याचे उघडकीस आले. तसेच एकाच कामासाठी दुबार देयके काढल्याचेही समोर आले आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, या संबंधित कामांच्या तब्बल १३८ फाईल्स आणि मूळ कागदपत्रे कार्यालयातून संशयास्पदरित्या गहाळ करण्यात आली आहेत. या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने चौकशीसाठी विशेष समित्या नियुक्त केल्या होत्या. या समित्यांच्या तपासात देयके, कामांच्या नोंदी आणि मूळ कागदपत्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या. त्यानंतर १७ जून २०२६ रोजी कुलगुरूंच्या मान्यतेनंतर कुलसचिव कार्यालयाने पोलिसांत तक्रार दाखल करण्याचे लेखी आदेश दिले. कायदेशीर सल्ला घेतल्यानंतर २९ जुलै रोजी विद्यापीठ प्रशासनाने एमआयडीसी पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली.

## जरांगेंचे आंदोलन म्हणजे सीरिअलचा शो, शिंदे प्रोड्युसर अन् सामंत डायरेक्टर

### ॲड.गुणरत्न सदावर्तेंचा घणाघात, जरांगेंना तत्काळ अटक करण्याची मागणी

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी अंतरवली सराटीत उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावरून ज्येष्ठ वकील ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी राज्य सरकार आणि जरांगे यांच्यावर अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका केली आहे. ‘‘हे आंदोलन नसून दरवर्षी येणारा टीव्ही सीरिअलचा शो आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ



शिंदे या शोचे प्रोड्युसर आहेत, उद्योगमंत्री उदय सामंत डायरेक्टर आहेत, तर मनोज जरांगे हे केवळ स्क्रिप्टनुसार काम करणारे हेकडी कलाकार आहेत,‘‘ असा घणाघाती आरोप सदावर्ते यांनी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

तसेच, महिला आयएएस अधिकाऱ्याशी असभ्य वर्तन करणे, मुंबईची शांतता भंग करणे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा अवमान केल्याप्रकरणी मनोज जरांगे पाटील यांना तत्काळ अटक करून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करावे, अशी थेट मागणी त्यांनी केली.

पत्रकार परिषदेत राजकीय स्थितीवर ताशेरे ओढताना सदावर्ते म्हणाले, ‘‘राज्यात सध्या जातीय राजकारणाचा एक सीझन सुरू आहे. टीव्हीवर जशा मालिकांचे एपिसोड सुरू असतात, तसाच हा जरांगे सीझन आहे. या सीझनचे प्रोड्युसर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत, डायरेक्टर उदय सामंत आहेत आणि मनोज जरांगे हे मुख्य कलाकार आहेत.‘‘

‘‘हे आंदोलन नसून पूर्णपणे स्क्रिप्टनुसार चालणारा शो आहे. मंत्री अंतरवलीत जाणार, चर्चा करणार, तिथे रुग्णवाहिका तयार राहणार आणि रुग्णालयात दाखल होणार; हे सगळे आधीच ठरलेले असते. जनतेच्या करमणुकीचा आणि यूट्युबर्सच्या रोजीरोटीचा हा विषय झाला आहे.‘‘

जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि जरांगे यांच्यातील संवादाचा संदर्भ देत सदावर्ते म्हणाले. एका महिला आयएएस अधिकाऱ्यासमोर ज्या प्रकारची भाषा वापरली गेली, ती अत्यंत आक्षेपार्ह आहे. ‘‘देशातील आयएएस असोसिएशन आणि महिला संघटना आता कुठे गेल्या? एका महिला अधिकाऱ्याच्या सन्मानाला धक्का लागत असताना त्या शांत का आहेत?‘‘ असा सवाल त्यांनी केला. उदय सामंत यांनी जरांगेंच्या प्रकृतीपेक्षा त्यांच्या भाषेची आणि वर्तनाची चिंता केली पाहिजे, असा टोलाही त्यांनी लगावला.

## सीजेपीमध्ये फूट, अहमदाबादच्या मनीष ब्रह्मभट्ट यांच्याकडून सीजेपी लोकशाहीवादी पक्षाच्या स्थापनेची घोषणा

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- कॉकरोच जनता पार्टीमध्ये मोठी फूट पडली असून मूळ आंदोलनाशी जोडलेल्या कार्यकर्त्यांनी वेगळी चूल मांडली आहे. कॉकरोच जनता पार्टी ही आता पूर्णपणे अरविंद केजरीवाल यांची पार्टी बनली आहे, असा गंभीर आरोप करत मनीष ब्रह्मभट्ट नावाच्या युवकाने गुरुवारी (३ सप्टेंबर) कॉकरोच जनता पार्टी डेमोक्रेटिक स्थापनेची अधिकृत घोषणा केली.

अहमदाबादचे रहिवासी असलेले मनीष ब्रह्मभट्ट यांनी दिल्लीच्या जंतर-मंतरवर झालेल्या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली होती. सीजेपी आंदोलनानंतर सर्व काही विकले गेले आणि ही केवळ टीम केजरीवाल बनून राहिली आहे, असा दावा त्यांनी केला. तसेच दिपकेने आपल्या टीममध्ये मित्र आणि मैत्रिणींचा भरणा केल्याचा आरोपही ब्रह्मभट्ट यांनी केला.

अभिजीत दीपके यांच्यावर थेट निशाणा साधत ब्रह्मभट्ट म्हणाले, ‘‘अभिजीत दीपके यांनी घर बसल्या १२ लोकांची टीम तयार केली. यासाठी कोणत्याही मूळ कार्यकर्त्याला किंवा आंदोलनाशी जोडलेल्या लोकांना बोलावण्यात आले नाही. या पदांसाठी काय निकष लावले गेले? त्यांनी आम आदमी पार्टीशी जोडलेल्या आठ लोकांना, स्वतःच्या मैत्रिणींना आणि कॉलेजच्या मित्रांना यात जोडले आहे.‘‘

आम्हाला प्रत्येक राज्यातून ५ प्रतिनिधी हवे होते, जेणेकरून (पान ४ वर)

## बार कौन्सिल ऑफ इंडियाला कायद्याच्या विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार नाही-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- बार कौन्सिल ऑफ इंडियाला (बीसीआय) कायद्याच्या विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीच्या आधारावर त्यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थेची आहे. हैदराबाद येथील नालसार विधी विद्यापीठाच्या २०२६ च्या तुकडीतील विद्यार्थ्यांशी संबंधित एका वादामध्ये न्यायालयाने हा निकाल दिला. दीक्षांत समारंभासाठी सरन्यायाधीश सूर्यकांत यांना प्रमुख पाहुणे म्हणून नियुक्त केल्याच्या विरोधात विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. यानंतर, बीसीआयने विद्यार्थ्यांची वकील म्हणून नोंदणी निलंबित करण्याचे आणि या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने म्हटले आहे की, वकील कायदा, १९६१, बीसीआय किंवा राज्य बार कौन्सिलला कायद्याच्या विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा कोणताही स्पष्ट किंवा गर्भित अधिकार देत नाही. न्यायालयाने बीसीआयचे अध्यक्ष मनन कुमार मिश्रा यांनी १३ ऑगस्ट रोजी जारी केलेला आदेश बेकायदेशीर घोषित केला. नालसारचे दोन माजी विद्यार्थी, मिहिरा सूद आणि अभिषेक तिवारी यांनी या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांनी म्हटले आहे की, विद्यार्थ्यांविरुद्ध अशी कारवाई करण्याचा अधिकार बीसीआयला नाही.

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने (पान ४ वर)

## राज्याचा ८.८ टक्के विकासदर चांगलाच, पण आम्हाला १० टक्क्यांचा टप्पा ओलांडायचाय-देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पूर्ण करण्याच्या अगदी उंबरठ्यावर असून, सध्याचा ८.८ टक्के विकासदर चांगला असला तरी राज्याला १० टक्क्यांहून अधिक विकासदराचा टप्पा ओलांडायचा आहे, असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. एबीपी माझाच्या माझा इन्फ्रा व्हिजन या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

महाराष्ट्र हे पहिलेच राज्य असेल जे १ ट्रिलियन इकोनॉमीचे स्वप्न पाहत आहे, ते पूर्ण व्हावे ही सर्वांचीच इच्छा आहे. मात्र आजचा आपला ग्रोथ रेट ८.८ टक्क्यांवर आहे. २०३० सालापर्यंत १ ट्रिलियन इकोनॉमी होण्यासाठी हा ग्रोथ रेट वाढायला हवा का, याबाबत विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनेक राज्ये १ ट्रिलियन डॉलर इकोनॉमी होण्याचे स्वप्न बघत आहेत. पण आज त्या स्वप्नाच्या जवळ कोण असेल, तर केवळ महाराष्ट्र आहे, कारण आपण ६६० बिलियनवर पोहोचलो आहोत. आपण ट्रिलियनच्या खूप जवळ आहोत. आपण शाश्वत विकास दर ठेवला, तर निश्चितपणे २०३० मध्ये आपण १ ट्रिलियन डॉलर इकोनॉमी बनवू, असे त्यांनी म्हटले.

## सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांना मारहाण करणारा गजाआड

### पोलिस आयुक्तांचा कठोर कारवाईचा इशारा

पुणे दि.३ (प्रतिनिधी)- पुण्यातील गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजे, साऊंड सिस्टीम आणि ध्वनिप्रदूषणाविरोधात आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांना भररस्त्यात मारहाण करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. संतोष चव्हाण असे या आरोपीचे नाव असून, तो एका स्थानिक गणेश मंडळाचा माजी अध्यक्ष असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेची गंभीर दखल घेत पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी कडक कारवाईचे निर्देश दिले असून, शहरात अशा प्रकारची गुंडगिरी खपवून घेतली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

संतोष चव्हाण हा पुण्यातील कोथरूड परिसरातील राऊतवाडी येथील रहिवासी आहे. तो एका स्थानिक बांधकाम व्यावसायिकाकडे नोकरीला असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. राऊतवाडी येथील प्रियदर्शनी गणेश मंडळाचा तो माजी अध्यक्ष राहिला असून, स्वतःला कट्टर गणेशप्रेमी म्हणवून घेतो.

टिळक रस्त्यावरील कशाळे चौकात विद्यानंद बापट एका वृत्तवाहिनीला थेट मुलाखत देत असताना संतोष चव्हाणने अचानक त्यांच्या अंगावर धावून जात त्यांना मारहाण केली. ‘‘तू आमच्या गणेशोत्सवाला विरोध का करतोस?‘‘ असा जाब विचारत त्याने हा हल्ला केला. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतरही त्याने केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप न बाळगता, ‘‘बापट यांना केवळ गणेशोत्सवच दिसतो का? त्यांना अजून मारायला पाहिजे होते,‘‘ असे संतापजनक वक्तव्य करत हल्ल्याचे समर्थन केले.

हल्ल्यापूर्वी सोशल मीडियावर (पान ४ वर)

## राज्य सरकार सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यात पूर्णपणे अपयशी-आदित्य ठाकरे

नाशिक दि.३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात आज प्रत्येक समाजघटकाला आपल्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागत असून राज्य सरकार सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहे, असा घणाघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी केला. नाशिकमध्ये सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या उपोषणाला भेट दिल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न, राज्यातील खड्डे, कायदा-सुव्यवस्था, पुण्यात विद्यानंद बापट यांच्यावर झालेला हल्ला आणि अयोध्या राम मंदिरातील चंदा चोरीच्या आरोपांवरून महायुती व केंद्र सरकारवर जोरदार तोफ डागली.

नाशिकमध्ये वसतिगृह आणि आश्रमशाळांच्या मूलभूत मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे उपोषण सुरू आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, ‘‘गेल्या १२ दिवसांपासून ही मुले उपोषणाला बसली आहेत. त्यांच्या मागण्या काही देश हलवणाऱ्या नाहीत, तर वसतिगृह, आश्रमशाळा आणि शिक्षणाच्या अत्यंत मूलभूत सुविधांसंबंधी आहेत. मात्र, मुख्यमंत्र्यांकडून (पान ४ वर)

# अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार काहीतरी लपवतंय; नाना पटोलेंचा थेट आरोप

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी विरोधकांनी राज्य सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. या दुर्घटनेबाबत पोलिसांत अद्याप एफआयआर नोंदवण्यात न आल्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना आता काँग्रेसनेही जाहीर पाठिंबा दिला आहे. ‘‘अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार नक्कीच काहीतरी लपवत आहे,‘‘ असा गंभीर आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी केला आहे. याशिवाय, सत्तेत असलेल्या राष्ट्रवादीच्या ४० आमदारांच्या मौनावरही त्यांनी संशय व्यक्त केला. पत्रकार परिषदेत बोलताना नाना पटोले यांनी अजितदादांचा अपघाती मृत्यू, राष्ट्रवादीच्या आमदारांची भूमिका आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरील पंतप्रधानांच्या दाव्यांवरून सरकारवर कडाडून टीका केली.

अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणावर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले. ‘‘अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार काहीतरी लपवत आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतलेली भूमिका अत्यंत योग्य आणि रास्त आहे.‘‘

‘‘सध्या सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे जे आमदार सत्तेत आहेत, त्यांनी या प्रकरणावर गुन्हा का दाखल झाला नाही, अशी कोणतीही भूमिका अद्याप मांडलेली नाही. त्यांच्या आमदारांनी एफआयआरची साधी मागणीही केली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात काय गोम दडली आहे, हे कळायला मार्ग नाही.‘‘

यापूर्वी खासदार सुप्रिया सुळे यांनी संतप्त सवाल करत सरकारला धारेवर धरले होते. ‘‘माझा भाऊ गेला, राज्याच्या एका विद्यमान उपमुख्यमंत्र्यांचा एवढा मोठा भीषण अपघात झाला; तरीही सरकारने त्यावर साधा गुन्हा का दाखल केला नाही? राष्ट्रवादीचा गट सत्तेत भागीदार असताना त्यांच्या ४० आमदारांनी किंवा ९ मंत्र्यांनी एफआयआर आणि चौकशीवर एक शब्दही का काढला नाही?‘‘ अशी उद्विग्नता त्यांनी व्यक्त केली होती. या संदर्भात आमदार रोहित पवार यांनीही वारंवार पोलिसांत एफआयआर नोंदवण्याची मागणी लावून धरली आहे.

देशाचा जीडीपी वाढल्याबाबत (पान ४ वर)

## पाकिस्तानात १०० वर्षांहून अधिक जुन्या ऐतिहासिक हिंदू मंदिराची तोडफोड; भारत सरकारकडून तीव्र निषेध

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- पाकिस्तानातील नारोवाल परिसरात एका १०० वर्षांहून अधिक जुन्या ऐतिहासिक हिंदू मंदिराची तोडफोड करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेवर भारताने तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला असून या कृत्याचा कडक शब्दांत निषेध नोंदवला आहे. पाकिस्तान सरकारने या प्रकरणाची तात्काळ आणि पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने केली आहे. या संदर्भातील वृत्त ‘द इंडियन एक्स्प्रेस’ या वृत्तसंस्थेने दिले आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकृत प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या घटनेबाबत भारताची भूमिका स्पष्ट केली. ‘‘पाकिस्तानमधील नारोवाल जिल्ह्यातील सिरोज गावात एका ऐतिहासिक हिंदू मंदिराची तोडफोड झाल्याची बातमी अत्यंत चिंताजनक आहे. अल्पसंख्याकांच्या एका शतक जुन्या प्रार्थनास्थळाची विटंबना आणि तोडफोड करणाऱ्या या घृणास्पद कृत्याचा भारत तीव्र निषेध करतो,’’ असे जयस्वाल यांनी म्हटले आहे.

स्थानिक प्रशासनाच्या निष्क्रियतेवर बोट ठेवताना ते पुढे म्हणाले, ‘‘एका १०० वर्षे जुन्या मंदिराचे रक्षण करण्यात (पान ४ वर)

# आज श्रीकृष्ण जन्माष्टमी

जन्माष्टमी म्हणजे, जणू तरुणाईतील उत्साहच. एव्हाना थरांचा सराव गल्लोगल्ली सुरू झाला आहे. मात्र, संस्कृतीचा हा ठेवा साजरा करण्यामागे काय परंपरा आहेत, याचा मागोवा घेणे क्रमप्राप्त आहे. या सणाचे नियम, प्रथा व परंपरा काय आहे, याबाबत केलेले विवेचन.

कृष्ण जन्माष्टमी म्हणजे गोकुळ अष्टमी, कृष्ण जन्माचा दिवस. श्रावण महिन्यात वद्य अष्टमी या तिथीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदिशाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. हा उत्सव भारतात सर्वत्र होतो. गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका, पुरी या ठिकाणी तो मोठय़ा प्रमाणावर होतो. ओरिसामध्ये दहीहंडी जत्रा किंवा दहीभंगा जत्रा या दिवशी साजरी केली जाते. गोकुळ अष्टमीच्या दिवशी उपवास करण्याची प्रथा आहे. गुजराथमध्ये 'सातम' म्हणजे सप्तमीच्या दिवशी पैसे लावून किंवा दिवसभर पत्ते खेळतात. रात्री बारा वाजता पत्ते बंद करून कृष्णजन्माचा उत्सव सुरू करतात.

मध्य प्रदेशात आणि उत्तरी भारताच्या बर्‍याचशा भागात पौर्णिमान्त महिना असलेले पंचांग वापरात असल्याने या दिवशी त्यांची भाद्रपद कृष्ण अष्टमी येते. या दिवशी कित्येकांच्या घरी गोकुळ-वृंदावनाचा देखावा तयार करून जन्मोत्सव साजरा करतात. वैष्णव लोक तर, हा दिवस विशेष भक्तीने पाळतात. वृंदावन येथे या दिवशी दोलोत्सव असतो. याच दिवशी कृष्णाच्या आयुष्यातील महत्त्वाची संकल्पना रासलीला हिचे सादरीकरण केले जाते.

अष्टमीच्या दिवशी एकभुक्त राहून पांढर्‍या तिळाचा कल्क अंगाला लावून स्नान करतात. व्रताचा संकल्प करून देवघर लता-पल्लवानी सुशोभित करतात. त्या स्थानी देवकीचे सूतिकागृह स्थापन करतात. मंचकावर देवकी आणि कृष्ण यांच्या मूर्तीची स्थापना करतात. दुसर्‍या बाजूला यशोदा आणि तिची कन्या (आदिमाया),वसुदेव, नंद, यांच्या मूर्ती बसवितात. सप्तमीच्या मध्यरात्री शुचिर्भूत होऊन संकल्प करतात व सपरिवार श्रीकृष्णाची षोडशोपचार पूजा करतात. रात्रौ कथा, पुराण, नृत्य, गीत इ. कार्यक्रमांनी जागरण करतात. अष्टमीच्या दिवशी उपवास करतात व देवालाही फराळाच्या जिन्नसांचा नैवेद्य दाखवितात. नवमीच्या दिवशी पंचोपचार करून उत्तरपूजा करून महानैवेद्य समर्पण करतात. पूजा झाल्यानंतरचे कृत्य अग्नी पुराणात सांगितले आहे. पूजा करून पुरुषसुक्ताने, विष्णूसुक्ताने व इतर स्तोत्रांनी स्तवन करावे. वाद्यांचा घोष, गीतांचे मंगल स्वर, पुराण-इतिहासातील निरनिराळ्या सत्कथा ऐकत ती रात्र घालवावी. गोकुळातील कृष्णजन्माच्या लीला श्रवण केल्यानंतर वैष्णवांनी परस्परांवर दही इ. चे सिंचन करावे. कारण, गोपाळांनी दही, दूध, घृत, उदक, यांनी परस्परांवर सिंचन व लेपन केले, असे भागवतामध्ये वचन आहे. त्यावरून असा विधी प्राप्त होतो. कृष्णाला लोणी आणि साखर एकत्र करून त्याचा प्रसाद दिला जातो.

उत्सवासाठी तयार केल्या जाणार्‍या विशिष्ट प्रसादास गोपाळकाला असे म्हणतात. कृष्ण जयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. महाराष्ट्रात विशेषत: कोकणात या उत्सवानिमित्त दुसर्‍या दिवशी दहीकाला होतो व त्याचे सेवन करून उपवास सोडला जातो. गोविंदा आला रे आला, गोकुळात आनंद झाला.. असे गाणे गात अनके लहान-थोर पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात.

कित्येक ठिकाणी गोपाळकाला करून कृष्ण चरित्रातील सोंगे आणण्याचाही प्रघात आहे. या दिवशी महाराष्ट्रात, विशेषत: मुंबईत, उंच मडक्यात दही-दुधाने भरलेला हंडा ठेवून तेथपर्यंत मानवी मर्नोयावरून पोहोचून तो हंडा फोडण्याचा 'गोविंदा' हा साहसी खेळ होतो. हा महाराष्ट्रातील एक वैष्णव नृत्योत्सव आहे. श्रीकृष्णाने व्रज मंडळात गाई चारताना आपण व आपले सवंगडी या सर्वांच्या शिर्दोया एकत्र करून त्या खाद्यपदार्थाचा काला केला व सर्वासह त्याचे भक्षण केले, अशी कथा आहे. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा आहे. गोपाल म्हणजे गायींचे पालन करणार्‍या कृष्णाच्या या जन्मोत्सवाच्या निमित्ताने काल्याचा प्रसाद केला जातो. काला म्हणजे एकत्र मिळिवणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, धानाच्या लाह्या, लिंबू व आंब्याचे लोणचे, दही, ताक, चण्याची भिजविलेली डाळ, साखर, फळांच्या फोडी इत्यादी घालून केलेला एक खाद्यपदार्थ. हा कृष्णास फार प्रिय होता. श्रीकृष्ण व त्याचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर हा तयार करीत असत व वाटून खात असत, असे मानले जाते. (९) गोमंतकात याच काल्याला गवळणकाला म्हणतात. हा काला तिथल्या कलावंतिणी करतात. त्यात एका मुलीला कृष्णाचे सोंग देऊन कृष्णलीलेची गाणी म्हणतात. शेवटी कृष्णाकडून दहीहंडी फोडवितात. हा गवळण काला दशावतारी खेळानंतर किंवा देवस्थानाचा रथोत्सव झाल्यानंतर होतो.

# गोकुळाष्टमी : कृष्णजन्माचा उत्सव की माणुसकी जागविण्याचा संदेश?

## कृष्णाच्या जीवनातील प्रेम, समता, कर्तव्य आणि संघर्षाची शिकवण आजच्या समाजाने आत्मसात करण्याची गरज



श्रावण संपत येतो आणि भाद्रपदाची चाहूल लागते, तेव्हा वातावरणात भक्तीचा सुगंध दरवळू लागतो. मंदिरांमध्ये सजावट होते, घराघरांत कृष्णजन्माची तयारी सुरू होते, गोकुळातील नंदलालाच्या बालरूपाचे स्मरण केले जाते आणि मध्यरात्री 'नंद के घर आनंद भयोः'चा जयघोष घुमतो. गोकुळाष्टमी म्हणजे केवळ भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव नाही, तर तो अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, प्रेमाला प्रतिष्ठा देण्याचा आणि जीवनात कर्तव्याला सर्वोच्च स्थान देण्याचा संदेश देणारा दिवस आहे. आज कृष्णाची पूजा मोठ्या भक्तिभावाने होते, पण कृष्णाने दिलेल्या विचारांची पूजा आपण किती करतो? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली. कंसाच्या अत्याचाराने मथुरा भयभीत झाली होती. सत्तेच्या मदाने उन्मत्त झालेल्या कंसाने आपल्या बहिणीच्या पोटी जन्मणारा आठवा पुत्र आपला अंत करेल, या भीतीने देवकी-वसुदेवांना कारागृहात डांबले. अशा अत्याचाराच्या अंधारात श्रीकृष्णाचा जन्म झाला. कृष्णाचा जन्मकाळ हा मध्यरात्रीचा, अंधाराचा. पण त्याच अंधारातून प्रकाश जन्माला आला. या कथेत आजच्या समाजासाठी मोठा संदेश दडलेला आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी आशेचा दिवा विझता कामा नये.

आजही समाजात अन्याय, भ्रष्टाचार, हिंसा, द्वेष, अंधश्रद्धा, शोषण आणि असमानतेचे अनेक 'कंस' आहेत. त्यांच्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी प्रत्येकाच्या मनातला कृष्ण जागा झाला पाहिजे. आपण कृष्णाचे चित्र डोळ्यासमोर आणतो तेव्हा हातात बासरी, डोक्यावर मोरपीस, चेहऱ्यावर हास्य आणि भोवती गोकुळातील गायी, असे सुंदर रूप दिसते. पण कृष्णाचे व्यक्तिमत्त्व एवढ्यापुरते मर्यादित नाही. कृष्ण हा प्रेमाचा संदेश देणारा, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारा, मैत्री जपणारा, संकटात मार्ग दाखवणारा आणि योग्य वेळी कठोर निर्णय घेणारा नेतृत्वकर्ता होता. त्याच्या जीवनात बाललीला होती, तर त्याच जीवनात कर्तव्याची कठोर परीक्षा देखील होती. म्हणूनच कृष्ण समजून घेणे म्हणजे केवळ त्याची आरती करणे नव्हे, तर त्याच्या विचारांचा आपल्या आचरणात स्वीकार करणे होय. कृष्णाच्या जीवनातील गोवर्धन पर्वताची कथा आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात विशेष अर्थपूर्ण वाटते. निसर्गाशी माणसाचे नाते काय असावे, याचा संदेश या कथेतून घेतला जाऊ शकतो. आज विकासाच्या नावाखाली जंगलतोड होते, नद्या प्रदूषित होतात, जलस्रोत बुजविले जातात आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो. हवामानबदलाचे परिणाम जगभर जाणवत आहेत. गोकुळाष्टमीच्या दिवशी कृष्णाची पूजा करताना निसर्गाची पूजा करण्याचा संकल्पही केला पाहिजे. कृष्णाला आवडणारी गोकुळाची हिरवाई आपण नष्ट करत असू, तर केवळ देव्हाऱ्यातील कृष्णाला फुले वाहून काय उपयोग? कृष्णाच्या बाललीला हा गोकुळाष्टमीचा सर्वांत आनंददायी भाग. लोणी चोरणारा कान्हा, गोप-गोपिकांबरोबर खेळणारा कृष्ण आणि यशोदेच्या प्रेमात वाढणारा नंदलाल, हे रूप प्रत्येकाच्या मनाला भावते. परंतु या बाललीलांमध्ये जीवनातील साधेपणाचा सुंदर संदेशही आहे. आज बालपणावर स्पर्धेचे, अपेक्षांचे आणि तंत्रज्ञानाचे ओझे वाढत आहे. मुलांच्या हातातील मातीचे खेळणे कमी झाले आणि मोबाईलचा पडदा वाढला. त्यांना खेळू द्या, प्रश्न विचारू द्या, चुका करू द्या, निसर्गाशी जोडू द्या. कृष्णाच्या बाललीलांचे स्मरण म्हणजे बालमनातील निरागसतेचा सन्मान करणेही होय.

गोकुळाष्टमी म्हटले की दहीहंडीचा उत्साह अपरिहार्य. उंचावर बांधलेली हंडी फोडण्यासाठी तरुणांची मानवी मनोरे रचले जातात. एखादा पडतो, दुसरा त्याला आधार देतो; एखाद्याचा हात सुटतो, तर दुसरा हात पुढे करतो. ही केवळ करमणूक नाही. दहीहंडी आपल्याला सांगते, एकटा माणूस कितीही ताकदवान असला तरी सामूहिक शक्तीपुढे त्याची ताकद मर्यादित असते. आज समाजात जात, धर्म, भाषा, पक्ष, विचारधारा आणि आर्थिक स्तर यांच्या आधारावर भिंती उभ्या राहत आहेत. अशा वेळी दहीहंडीचा खरा संदेश समजून घेण्याची गरज आहे. एकमेकांना खाली खेचण्यात नव्हे, तर एकमेकांना वर उचलण्यात समाजाचे खरे सामर्थ्य आहे. कृष्णाचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे भगवद्गीतेचा संदेश. युद्धभूमीवर संभ्रमात पडलेल्या अर्जुनाला कृष्णाने कर्तव्याची जाणीव करून दिली.

आजचा माणूसही अनेक प्रश्नांनी घेरलेला आहे. करिअरची चिंता, आर्थिक ताण, नात्यांमधील दुरावा, स्पर्धा, अपयशाची भीती आणि भविष्याची अनिश्चितता यामुळे मानसिक अस्वस्थता वाढत आहे. अशा वेळी गीतेचा कर्मयोग आपल्याला सांगतो, परिस्थितीपासून पळून जाऊ नका, कर्तव्याला सामोरे जा. कर्म करणे आवश्यक आहे, मात्र त्या कर्मामागे प्रामाणिकपणा, विवेक आणि समाजहिताची भावना असली पाहिजे. आज धर्माच्या नावावर समाजात तणाव निर्माण होताना दिसतो. सोशल मीडियावर अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि एकमेकांविरोधात विष पेरणारे शब्द सहज पसरतात. कृष्णाच्या नावाचा जयघोष करणाऱ्या समाजाने कृष्णाचा संवाद, मैत्री आणि विवेकाचा मार्ग विसरता कामा नये. कृष्णाने विविध व्यक्तींशी नाती जोडली. सुदाम्यासारख्या मित्राशी असलेली त्याची मैत्री आजही आदर्श मानली जाते. या मैत्रीत श्रीमंती-गरिबीची भिंत नव्हती. मग कृष्णभक्तीचा अर्थ आपल्या शेजाऱ्याच्या दुःखाकडे पाठ फिरवणे कसा असू शकतो? देवाला नैवेद्य दाखविण्यापूर्वी भुकेल्या माणसाच्या ताटात अन्न वाढले, तर तीच खरी भक्ती! कृष्णाच्या कथांमध्ये राधा, रुक्मिणी, द्रौपदी आणि इतर स्त्री व्यक्तिरेखांशी संबंधित अनेक संदर्भ येतात. आजच्या समाजात महिलांच्या सुरक्षिततेचा आणि सन्मानाचा प्रश्न गंभीर आहे. गोकुळाष्टमीच्या निमित्ताने मंदिरात दिवे लावण्याबरोबरच मुली-महिलांना सुरक्षित वातावरण देण्याचा संकल्प केला पाहिजे. स्त्रीचा सन्मान करणारा समाजच खऱ्या अर्थाने संस्कृतीचा वारसदार म्हणवून घेऊ शकतो. उत्सव हवा, पण दिखावा नको!गोकुळाष्टमी मोठ्या उत्साहात साजरी झाली पाहिजे. मात्र उत्सवाच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण, प्लास्टिकचा अतिरेक, पाण्याची नासाडी किंवा धोकादायक दहीहंडी यांना प्रोत्साहन देणे योग्य नाही. उत्सव आनंदाचा असावा, पण कोणाच्या जीवावर बेतणारा नसावा. बालकृष्णाच्या जन्माचा उत्सव साजरा करताना बालकांच्या सुरक्षिततेचा विचार झाला पाहिजे. दहीहंडीमध्ये सहभागी होणाऱ्या गोविंदांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे. पर्यावरणपूरक सजावट आणि जबाबदार उत्सवाला प्राधान्य दिले पाहिजे.

कृष्ण जन्माला आला म्हणून कंसाचा अंत झाला, अशी कथा आपण ऐकतो. पण आजच्या काळातला 'कंस' एखादी व्यक्ती नसून अन्याय, भ्रष्टाचार, हिंसा, द्वेष, शोषण, व्यसन आणि असंवेदनशीलता हीच अनेक रूपे आहेत. ही वाईट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी बाहेर कुठेतरी कृष्ण शोधण्याची गरज नाही. आपल्या विवेकात, आपल्या कृतीत आणि आपल्या माणुसकीत कृष्ण जागा करावा लागेल. गोकुळाष्टमी म्हणजे देवळात गर्दी करण्याचा दिवस नाही, तर मनातील अंधार दूर करण्याचा दिवस आहे. कृष्णाची बासरी आपल्याला प्रेम शिकवो, कृष्णाचे सुदर्शन अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देवो, गीता कर्तव्याची दिशा देवो, दहीहंडी एकतेचा संदेश देवो आणि गोकुळातील निरागसता आपल्या मनात कायम राहो.

कृष्णाला डोक्यावर घेण्यापेक्षा त्याचे विचार डोक्यात घेणे अधिक गरजेचे आहे. आज समाजाला आणखी एका कृष्णजन्माची वाट पाहण्याची गरज नाही. प्रत्येक घरात, प्रत्येक मनात आणि प्रत्येक कृतीत माणुसकीचा कृष्ण जन्माला आला, तरच समाजातील अन्यायाचे कंस खऱ्या अर्थाने पराभूत होतील. हीच गोकुळाष्टमीची खरी शिकवण, हीच कृष्णभक्तीची खरी दिशा आणि हीच आजच्या काळाची सर्वांत मोठी गरज! श्रीकृष्णाच्या प्रेमाचा, कर्मयोगाचा आणि माणुसकीचा संदेश आपल्या जीवनात उतरू दे. समाजात शांतता, समता, बंधुता आणि सद्भावना नांदू दे. सर्वांना गोकुळाष्टमीच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**– प्रवीण बागडे**

# श्रीकृष्ण जन्माष्टमी : भगवान श्रीकृष्णाची महिमा अपरंपार

**श्रावण** कृष्णपक्ष अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव संपूर्ण भारतात गोकुळ अष्टमी किंवा श्रीकृष्ण जन्माष्टमी या नावाने मोठ्या उत्साहाने सर्वत्र साजरा केल्या जातो.पौराणिक कथेनुसार कृष्णाचा जन्म मथुरा येथे वासुदेव आणि देवकीच्या पोटी झाला.तेव्हा या दोघांना कंसाने बंदीस्त करून ठेवले होते. कंस हा अहंकारी राजा होता.त्याच्या अहंकाराने प्रजा अत्यंत त्रस्त होती. अशा परिस्थितीत आकाशवाणी होते. त्यात कंसाला सांगितले जाते की हे कसं तुझा शेवट देवकीचा आठवा पुत्र करेल.आकाशवाणीमुळे कंस भयभीत होतो आणि वासुदेव व देवकीला बंदीस्त करतो.अशा परिस्थितीत देवकीला सात पुत्र होतात त्यांचा सर्वांचा वध कंस करतो.यात आठवा पुत्र श्रीकृष्ण वाचतो आणि पुन्हा आकाशवाणी होते हे कंसा ज्याच्या हातांनी तुझा मृत्यू होणार आहे त्यांनी जन्म घेतलेला आहे सावधान!महाभारत ही पौराणिक कथा आहेच.परंतु आपल्या जीवनात घडणारे प्रसंग सुध्दा आहेत.जन्माष्टमीचा सण श्रावण महिन्यातील कृष्णपक्षातील अष्टमीला साजरा करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे.श्रावण महिन्यांतील कृष्णपक्षातील अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला.जन्माष्टमीच्या दिवशी लोक भक्तिभावाने उपवास करून पुजाअर्चना करतात व श्रीकृष्णाच्या जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो. हा उपवास नवमीला संपतो. संपुर्ण भारतात आपल्याला जन्माष्टमीचा अनेक मोठ-मोठे कार्यक्रम पहायला मिळतात.या निमित्ताने मोठ्या प्रमाणात दहिहंडीचे कार्यक्रम दिसून येतात.अनेक बालगोपाल (गोविंदा)या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा करतात.

जन्माष्टमीच्या दिवशी अनेक भाविक श्रीकृष्णाची स्थापना करतात व मोठ्या प्रमाणात सजावट करण्यात येते.कोणाकडे श्रीकृष्ण (काणोबा) दिड दिवसांचा असतो तर कोणाकडे पाच दिवसांचा असतो.या कालावधीत पुजाअर्चना करून आपली मनोकामना पूर्ण करण्याचे साकडे भक्तगण घालतात व विसर्जनाच्या दिवशी घरगुती दहिहांडी फोडून काला करतात आणि सर्वांना प्रसाद म्हणून वाटण्यात येतो.भगवान श्रीकृष्ण हे भगवान विष्णूचे आठवे अवतार आहेत. अहंकारी कंसाचा वध करण्यासाठी भगवान विष्णूंनी श्रीकृष्णावतार धारण केला व कृष्णाने मामा कंसाचा वध केला.ज्या ठिकाणी भगवान श्रीकृष्ण लहाण्याचे मोठे झाले ते ठिकाण म्हणजे उत्तर प्रदेशातील (मथुरा-वृंदावन) याठिकाणी जन्माष्टमीला मोठे उत्साहाचे आनंदाचे वातावरण असते.भारतातील संपूर्ण श्रीकृष्ण मंदिरांची सजावट करून मोठ्या थाटामाटात उत्सव साजरा केला जातो.भारतातील जगप्रसिद्ध मथुरा आणि वृंदावनमधील सर्व श्रीकृष्ण मंदिरे पहाण्यासाठी देशातील तसेच जगाच्या कानाकोपऱ्यातून भक्तगण व पर्यटक इथे येऊन श्रीकृष्णाचे दर्शन घेतात.गुजरातमधील व्दारका येथे एक वेगळा उत्सव साजरा केला जातो या ठिकाणी कृष्णाने आपले राज्य स्थापन केले होते.

महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये जन्माष्मीच्या दरम्यान दही हंडीचे कार्यक्रम करून उत्सव साजरा करतात. त्याचप्रमाणे गुजरात मधील कच्छ जिल्ह्यातील शेतकरी बैलगाड्या सजवून त्यावर भगवान श्रीकृष्णाची मूर्ती ठेवून नाचत-गाजत मिरवणुक काढतात. अशाप्रकारे संपूर्ण भारतात जन्माष्टमी आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते.महाभारतात श्रीकृष्णाने सत्याची बाजू घेत शेवटपर्यंत अर्जुनाचे सारथी रहाले.बाळ श्री कृष्ण दही आणि लोणी नेहमी खायचा त्यांचे आवडीचे प्रतीक आणि आपल्यासाठी प्रसाद म्हणून महाराष्ट्रात दहीहंडीची प्रथा आहे.जन्माष्मी भारतातच नाही तर जगातील अनेक देशांतील भारतीय श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या थाटामाटात साजरी करतात.कारण भारतातील संस्कृतीने अनेक देशांना बरेच काही दिले आहे. देवकी मानवी देहाचे प्रतीक मानले जाते तर वासुदेव प्राणशक्तीचे प्रतीक आहे.

मानवी देहामध्ये जेव्हा प्राणशक्ती वृध्दिंगत होते तेव्हा भगवान श्रीकृष्णाची म्हणजे आनंदाची अनुभूती प्राप्त होते. त्यामुळे आपल्याला सर्वत्र मंगलमय वातावरण दिसून येते.सृष्टीचे पालनहार म्हणजे विष्णूचे आठवे अवतार भगवान श्रीकृष्ण यांच्या जन्मत्सोवाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला पाहिजे.कारण बदलत्या हवामानामुळे व वाढत्या अलनिनोच्या प्रभावामुळे निसर्गाचे संतुलन दीवसें-दीवस डगमगत आहे. यामुळे प्रत्येक सणासुदी वृक्षलागवड काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे श्रीकृष्णाचा सहवास नेहमीच बालगोपालांसोबत वृक्षांच्या सानिध्यात रहायचा. त्यामुळे आज आपणास सर्वांवर ती वेळ येऊन ठेपली आहे की वृक्ष बिना जीवन अधुरे आहे.यामुळे आज वृक्ष लागवड अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल, गुरांना चारा उपलब्ध होईल, ऑक्सिजनची मात्रा वाढेल व संपूर्ण भारत भुमि (सृष्टी) प्रफुल्लित राहील आणि निसर्गाची व पृथ्वी मातेची रक्षा करण्यास मोठी मदत होईल.गोकुळ अष्टमीच्या हार्दिक शुभेच्छा!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**

# स्वच्छ डबे, निरोगी प्रवास ; नांदेड रेल्वे विभागाची स्वच्छतेसाठी व्यापक यांत्रिक मोहीम!

नांदेड विभाग, दक्षिण मध्य रेल्वे, प्रवासी डब्यांमध्ये स्वच्छता व आरोग्यदायी वातावरणाचा उच्च दर्जा कायम राखण्यासाठी यांत्रिकी स्वच्छता तसेच सातत्यपूर्ण देखरेखीच्या माध्यमातून स्वच्छता व स्वच्छताविषयक सुविधा अधिक चांगल्या करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

प्रत्येक पिटलाईन अटेन्शनदरम्यान सर्व डब्यांची विशेष यंत्रसामग्री व उपकरणांच्या सहाय्याने सर्वसमावेशक यांत्रिकी स्वच्छता नियमितपणे केली जाते. यामध्ये शौचालयांची उच्च दाबाच्या पाण्याच्या जेटद्वारे स्वच्छता, स्टेनलेस स्टीलच्या वॉशबेसिन व शौचालयातील कमोडची बफिंगद्वारे स्वच्छता, व्हेस्टिब्यूल व गँगवे परिसरातील चेकर्ड प्लेट्सची स्क्रबरच्या सहाय्याने स्वच्छता, दरवाजे व प्रवासी आसन परिसराची स्वच्छता तसेच पिटलाईन अटेन्शनदरम्यान डब्यांच्या बाह्य भागाची यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता करण्यात येते.

याशिवाय, गाडी टर्मिनल स्थानकावर टर्न-अराउंडदरम्यान दाखल झाल्यानंतर शौचालयांची जेट प्रेशरद्वारे स्वच्छता केली जाते. त्यामुळे उपलब्ध प्रत्येक टर्मिनल संधीदरम्यान शौचालयांची नियमित स्वच्छता व देखभाल सुनिश्चित केली जाते.

पिटलाईन व टर्मिनलवरील नियमित यांत्रिकी स्वच्छतेबरोबरच, महत्त्वाच्या गाड्यांमध्ये ऑन बोर्ड हाऊसकीपिंग (जइकड) सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. हाऊसकीपिंग कर्मचारी प्रवासादरम्यान स्वच्छतेशी संबंधित प्रवाशांच्या तक्रारी व समस्यांकडे लक्ष देण्यासाठी गाडीत उपलब्ध असतात. तसेच, ते नियमित अंतराने डब्यांची स्वच्छता करतात. त्यामुळे केवळ निर्धारित पिटलाईन अटेन्शनदरम्यानच नव्हे, तर संपूर्ण प्रवासादरम्यान डब्यांमध्ये स्वच्छता राखण्यास मदत होते.

स्वच्छता ही रेल्वे प्रशासन आणि प्रवासी/वापरकर्ते यांची सामूहिक जबाबदारी आहे. प्रवासादरम्यान स्वच्छता व आरोग्यदायी वातावरण राखण्यासाठी शौचालयांचा योग्य वापर करणे, विशेषतः प्रत्येक वापरानंतर योग्य पद्धतीने फ्लश करणे, अत्यंत महत्त्वाचे आहे. शौचालयातील फ्लशचा अयोग्य वापर किंवा गैरवापर केल्यास दुर्गंधी निर्माण होऊन अस्वच्छ परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे सहप्रवाशांना गैरसोय होण्याबरोबरच प्रवासादरम्यान स्वच्छता राखण्यात अडचणी निर्माण होतात.

# फिल्म एज्युकेशन अँड वेलफेअर फाउंडेशन आयोजित 'वर्ड सिनेमा आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल २०२६' चे छत्रपती संभाजीनगरमध्ये शानदार आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - फिल्म एज्युकेशन अँड वेलफेअर फाउंडेशनच्या वतीने येथील मौलाना आझाद रिसर्च सेंटरमध्ये आगामी ६ सप्टेंबर २०२६ रोजी 'वर्ड सिनेमा आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल २०२६' च्या पहिल्या वर्षाच्या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून देश-विदेशातील चित्रपट रसिकांना दर्जेदार कलाकृतींची मेजवानी मिळणार आहे.




या महोत्सवासाठी देश-विदेशातून आणि विविध प्रांतांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, सामाजिक, कौटुंबिक विषय तसेच नवीन आणि कल्पक संकल्पनांवर आधारित एकूण ५६० चित्रपट प्राप्त झाले आहेत. यामध्ये चित्रपट, लघुपट (शॉर्ट फिल्म्स), माहितीपट (डॉक्युमेंट्री), म्युझिक व्हिडिओ आणि विविध सामाजिक-कौटुंबिक विषयांवरील आशयघन कलाकृतींचा समावेश आहे. या महोत्सवादरम्यान १०१ कलाकारची नामनकन यादीत जाहीर करण्यात आली असून, उत्कृष्ट निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री तसेच विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कलाकारांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या विशेष गुणगौरव सोहळ्यामुळे चित्रपट सृष्टीतील नव्या प्रतिभेला मोठे प्रोत्साहन मिळणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. लक्ष्मी थोरात, तुषार थोरात, सुशांत पाटील, सागर जाधव आणि पोपट थोरात हे परिश्रम घेत आहेत.

या दिमाखदार सोहळ्याला चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलावंत सह, कलाकार पाशा खान आणि सीमा खान हे प्रमुख अतिथी म्हणून विशेष उपस्थित राहणार आहेत. चित्रपट सृष्टीतील नवे प्रवाह आणि प्रयोगशील कलाकारांच्या प्रतिभेला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवात प्रेक्षकांना वैविध्यपूर्ण कलाकृतींचा अनुभव घेता येणार आहे.

# हॉटेलसाठी साडेचार लाखांची वीजचोरी; मिटमिट्यात एकावर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - हॉटेलसाठी आकडा टाकून वीजचोरी करणाऱ्यावर महावितरणने पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

पडेगाव शाखेचे सहायक अभियंता प्रदीप निकम हे त्यांच्या सहकाऱ्यांसह७ जुलै २०२६ रोजी दुपारी मिटमिटा परिसरात वीजचोरीविरोधात मोहीम राबवत होते. परिसरातील एएल-आरजी हॉटेलमध्ये पाहणी केली असता तेथे लघुदाब वाहिनीवर आकडा टाकून वीजचोरी होत असल्याचे आढळले. येथे रफिक खान करीम खान याने १५१४युनिट वीजचोरी केली. त्याला ४ लाख ४७ हजार ७० रुपयांचे वीजचोरीचे निर्धारित बिल देण्यात आले तसेच १ लाख २० हजार रुपयांचे तडजोड शुल्क आकारण्यात आले. तथापि, दोन्ही बिले भरण्यास टाळाटाळ केल्याने सहायक अभियंता प्रदीप निकम यांच्या फिर्यादीवरून आरोपी रफिक खान करीम खान याच्यावर भारतीय विद्युत कायद्याच्या कलम १३५अन्वये छावणी पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला.

# वसतीगृह व आधार योजनांच्या प्रवेशासाठी मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत प्रवेशासाठी अर्ज करण्यास दि. १५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी या वाढीव मुदतीचा लाभ घेऊन ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी केले आहे.

शासकीय वसतीगृहातील प्रवेशासह संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनांसाठी पात्र असलेल्या तसेच अद्याप अर्ज सादर न केलेल्या विद्यार्थ्यांनी दि. १५ पूर्वी शासनाच्या https://hmasnew.mahait.org/ या संकेतस्थळावर आवश्यक माहिती व कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज सादर करावा. अंतिम मुदतीची वाट न पाहता विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असेही सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी कळिवले आहे.

# बदलत्या माध्यमविश्वात पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा- उपसंचालक प्रवीण टाके





छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – बदलत्या माध्यमविश्वात पारंपरिक पत्रकारितेसोबत डिजिटल माध्यमांचे महत्त्व वाढले आहे. पत्रकारांनीही आता सोशल मीडिया व नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. माहिती व जनसंपर्क विभागही बदलत्या माध्यम व्यवस्थेनुसार आपल्या कार्यपद्धतीत बदल करीत आहे, असे प्रतिपादन विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर विभागाचे नवनियुक्त उपसंचालक प्रवीण टाके यांची बुधवारी (दि.२) पत्रकार, संपादकांनी भेट घेतली. त्यानिमित्त दुपारी ४ वा. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात संवाद साधला. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहायक संचालक सुरेश पाटील, माहिती अधिकारी संजीवनी जाधव पाटील यांच्यासह विविध दैनिके, साप्ताहिक वृत्तपत्रांचे संपादक, प्रतिनिधी व पत्रकार उपस्थित होते.

नव्याने रुजू झालेले उपसंचालक प्रवीण टाके तसेच सहायक संचालक सुरेश पाटील व माहिती अधिकारी संजीवनी जाधव पाटील यांनी यावेळी माध्यम प्रतिनिधींना आपली ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी सर्व संपादक पत्रकारांचे स्वागत केले. तसेच पत्रकारांचा परिचय करुन दिला.स्थानिक स्तरावरील पत्रकारांच्या समस्या यावेळी अधिकाऱ्यांनी जाणून घेतल्या.

उपसंचालक प्रवीण टाके म्हणाले की, डिजिटल माध्यमांमुळे पत्रकारितेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. पत्रकारांनी डिजिटल माध्यमांचे आव्हान स्वीकारून सोशल मीडियाचा प्रभावी वापर करावा. पत्रकारांसाठी विविध विषयांवर प्रशिक्षण आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. पत्रकारांच्या समस्या, दैनंदिन अडचणी सोडवण्यास प्रशासनाचा प्राधान्य क्रम राहील,असेही त्यांनी सांगितले. माहिती अधिकारी संजीवनी जाधव पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# महाराष्ट्राच्या ऊर्जा विभागाच्या दालनाला सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण स्टॉलचा पुरस्कार

## नवी दिल्लीतील जागतिक परिषदेमध्ये ऊर्जा प्रदर्शनीला मोठा प्रतिसाद



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – नवी दिल्ली येथील 'भारत इलेक्ट्रिसिटी, पॉवरजेन इंडिया आणि इंडियन युटिलिटी वीक २०२६' या जागतिक परिषदेच्या ऊर्जा प्रदर्शनीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाच्या दालनाला सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण स्टॉल डिझाइनच्या पुरस्काराने बुधवारी (दि. २) गौरविण्यात आले. केंद्रीय विद्युत आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नवी दिल्ली येथील यशोभूमिमध्ये येथे १ ते ३ सप्टेंबरपर्यंत आयोजित 'भारत इलेक्ट्रिसिटी, पॉवरजेन इंडिया आणि इंडियन युटिलिटी वीक २०२६' परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्य 'फोकस स्टेट' म्हणून सहभागी झाले आहे. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आणि ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या नेतृत्वात राज्याने ऊर्जा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे सादरीकरण या परिषदेतील लक्षवेधक प्रदर्शनीच्या माध्यमातून करण्यात येत आहे व त्यास मोठा प्रतिसाद मिळत आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, महाऊर्जाचे महासंचालक श्री. ओमप्रकाश बकोरिया, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राधाकृष्णन बी., महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विक्रम कुमार यांच्या मार्गदर्शनात चारही संस्थांचे संयुक्त प्रदर्शनी दालन या परिषदेत उभारण्यात आले आहे. महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक गडकिल्ल्यांची ओळख तसेच हरित ऊर्जेतील प्रवासाचा संगम साधून या दालनाची रचना करण्यात आली आहे.

तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील सकारात्मक बदलाचे चित्र आणि तंत्रज्ञानावर आधारित हरित ऊर्जेच्या भविष्याकडे होणारा प्रवास दालनातून दाखविण्यात येत आहे.

ऊर्जा विभागाच्या या दालनाचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'इंटरॲक्टिव्ह टच वॉल'ला मोठा प्रतिसाद मिळाला. महावितरण, महानिर्मिती, महापारेषण आणि महाऊर्जा यांच्या प्रमुख योजना, प्रकल्प आणि यशाची माहिती या डिजिटल माध्यमातून देण्यात आली. तसेच 'इंटरॲक्टिव्ह स्क्रीन'वर ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरणाच्या माध्यमातून या चारही संस्थांचे यश आणि विविध उपक्रम डिजिटल स्वरूपात दाखवण्यात आले. यासह 'इमर्सिव्ह व्हर्च्युअल रिॲलिटी झोन'मधून घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषिपंप आणि सिन्नर सौर ऊर्जा प्रकल्पामध्ये व्हर्च्युअली फेरफटका मारता आला. या दालनात 'सेल्फी बूथ' देखील आकर्षण ठरले आहे. इंटरॲक्टिव्ह तंत्रज्ञान, व्हर्च्युअल अनुभव, डिजिटल माहिती आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आधारित रचना यामुळे हे दालन माहितीपूर्ण, नाविन्यपूर्ण ठरले आणि परिषदेतील सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण स्टॉल डिझाईनच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

# गणेश विसर्जन घाटाची साफसफाई करण्याबाबत नगरसेवक नाना काटे यांच्या पिं.चिं. मनपाला सुचना



पुणे दि. ३ ( प्रतिनिधी ) – येणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रहाटणी - पिंपळे सौदागर येथील संपुर्ण विसर्जन घाटाची पिंपरी चिंचवड पालिकेच्या स्थापत्य, विद्युत तसेच आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रभागातील नगरसेवक विठ्ठल नाना काटे यांनी नुकतीच प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विसर्जन घाटाची स्वच्छता आणि साफसफाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच परिसरातील लाईट आणि विद्युत खांबांची तपासणी करून ते सुरळीत करण्याबरोबरच आवश्यक त्या ठिकाणी घाटाची दुरुस्ती , डागडुजी करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

गणेशभक्तांना विसर्जनाच्या वेळी कोणतीही अडचण होऊ नये आणि विसर्जन प्रक्रिया सुरक्षित वातावरणात पार पडावी, यासाठी सर्व आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

याप्रसंगी स्थापत्य विभागाचे उपअभियंता सुनिल दांगडे, संजय बंडगर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक जाई जाधव, कनिष्ठ अभियंता समृद्धी पाटील, आश्लेषा सानप, कनिष्ठ अभियंता अमित पवार, आरोग्य निरीक्षक प्रणय चव्हाण, गणेश रासगे, विद्युत विभागाचे कनिष्ठ अभियंता बाप्पुसाहेब रोकडे आदी उपस्थित होते.

# ध्वनीविरहित व प्रदूषण विरहित तसेच लेझर शो विरहित गणेशोत्सव साजरा व्हावा

**आगामी** गणेशोत्सव हा ध्वनीविरहित, लेझर शोविरहित आणि प्रदूषणमुक्त पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुण्यापाठोपाठ नागपूरमध्येही अशा प्रकारचा पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची मागणी पुढे आली असून, त्याच धर्तीवर वैजापूर शहरातही गणेश मंडळे आणि युवा पिढीने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाचा उत्सव आहे. मात्र अलीकडच्या काळात उत्सवाच्या नावाखाली मोठ्या आवाजातील डीजे, ध्वनिक्षेपक तसेच लेझर शोचा वाढता वापर चिंतेचा विषय ठरत आहे. कानठळ्या बसविणाऱ्या मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. ध्वनिप्रदूषणाचा आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेता उत्सव साजरा करताना संयम बाळगणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे लेझरच्या तीव्र प्रकाशझोतामुळे डोळ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने गणेशोत्सवातील लेझर शोबाबतही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. उत्सवाच्या आनंदापेक्षा नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षितता अधिक महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

गणेश मंडळांनी स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारून परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच निर्माल्य संकलन आणि योग्य कचरा व्यवस्थापनावर भर देणे आवश्यक आहे. याशिवाय भाविकांना वाटण्यात येणारी खिरापत किंवा प्रसाद अनेकदा तासन्तास उघडा ठेवला जातो. त्यावर माशा व अन्य कीटक बसण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रसाद झाकून ठेवणे, स्वच्छतेची काळजी घेणे आणि तो सुरक्षित पद्धतीने भाविकांना वितरित करणे आवश्यक आहे. गणेशोत्सव हा केवळ धांगडधिंगा करण्याचा नव्हे, तर सांस्कृतिक, नैतिक, सामाजिक आणि मानवी मूल्यांचा संदेश देणारा उत्सव आहे. त्यामुळे युवा पिढीने पुढाकार घेत ध्वनी, प्रकाश आणि प्रदूषणाच्या दुष्परिणामांचा विचार करावा. यंदाचा गणेशोत्सव अधिक शिस्तबद्ध, स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि माणुसकीचा संदेश देणारा ठरवून आदर्श निर्माण करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# वधू-वर परिचय विशेषांक प्रसिद्ध



छत्रपती संभाजीनगर , दि. ३ (प्रतिनिधी) – ब्रह्मवृंद वैभव वधू वर सुचक केंद्र यांचे तर्फे दिनांक २ सप्टेंबर २०२६ रोजी हॉटेल नहूष येथे, सुधीर नाईक, जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, मिलिंद दामोदरे, अध्यक्ष ब्राह्मण समन्वय समिती, माणिक रत्नपारखी, अध्यक्ष श्री समर्थ राम मंदिर ट्रस्ट, डॉ. अभय मंडलिक, संचालक खाम गाव अर्बन को-ऑपरेटिव बँक, श्री सुहास ठोसर अध्यक्ष श्री जय रघुवीर समर्थ संस्था यांच्या प्रमुख उपस्थितीत ब्रह्मवृंद वधू वर परिचय विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी समाजातील विवाह प्रश्न प्रश्नां संबंधी कोणत्या पद्धतीने काम करता येईल याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. व्यक्तिगत संपर्क आणि समुपदेशन यातून या प्रश्नाची निश्चित उकल होईल असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय पिंपळे यांनी केले. गोविंद गालफाडे, प्रवीण महाजन, सुहास ठोसर, वर्षाताई धनोरकर सौ.दीप्ती देशपांडे सौ. अश्विनी लोटांगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रसिद्ध झालेल्या पुस्तिकेच्या प्राप्तीसाठी दत्तात्रय पिंपळे मोबाईल क्रमांक ९४० ३९ २२ ८६२ यांच्याशी संपर्क साधावा असे संस्थेतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

# याचिकाकर्ते विनोद पाटील यांची मनोज जरांगेंच्या भाषेवर नाराजी! 'कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा' दाखला देत जरांगेंना दिला थेट इशारा

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज पाचवा दिवस आहे. मात्र, उपोषणादरम्यान जरांगे पाटील यांनी वापरलेल्या भाषेवरून आता मराठा आंदोलनातच मोठी खळबळ उडाली आहे. मराठा आरक्षणाचे अभ्यासक विनोद पाटील यांनी जरांगेंच्या वक्तव्यावर तीव्र नाराजी व्यक्त करत थेट इशारा दिला आहे.

विनोद पाटील म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण आमच्यावर आहे. कल्याणच्या सुभेदाराची सून सन्मानाने परत करणारी आमची अवलाद आहे, त्यामुळे महिलांचा सन्मान झालाच पाहिजे. महिला दंडाधिकारी असो किंवा कोणतीही महिला, चुकीची भाषा वापरली असेल तर ती चुकीचीच आहे. 'जरांगे उपाशी असल्याने त्यांची चिडचिड समजण्यासारखी आहे, पण शिवरायांच्या स्मारकासमोर बसून जबाबदारीने बोलले पाहिजे, असेही ते म्हणाले. भांडणाचा फायदा घेऊन आरक्षणाचा मूळ विषय भरकटवला जात असल्याचा आरोप करत विनोद पाटील यांनी जरांगेंना चांगल्या भाषेचा वापर करण्याची विनंती केली. तसेच, 'महिला जिल्हाधिकाऱ्यांशी आमचा वाद नाही, मंचावरील शब्द त्यांच्यासाठी नव्हते,' असा खुलासा करत मराठा समाज कोणत्याही अधिकाऱ्याच्या विरोधात नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# संशयित वीजमीटर जप्तीस विरोध; दोघांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या पाहणीत वीजचोरीचा संशय असलेले मीटर जप्त करण्यास करत शिवीगाळ व धमकी दिल्याप्रकरणी दोघांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

महावितरणच्या गारखेडा उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता संतोष अधिकार, सहायक अभियंता एस.एल. मेंढे, पल्लवी पाटील, निलेश पन्नाभट्टी, ओमप्रकाश महाजन, शेख जोहरा, उजगरे, लाईनमन अब्दुल हमीद, दांडगे, पाखरे, एनसीसी कंपनीचे मीटर बदलणारे कर्मचारी हे पोलिस कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन २ सप्टेंबर २०२६ रोजी मीटर चेक करण्यासाठी तसेच वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांवर कारवाई करण्यासाठी न्यायनगरमध्ये गेले होते. दुपारी ४.३० वाजेच्या सुमारास एल.डी. सोनवणे व गणेश विष्णू जाधव या दोघांच्या घराच्या मीटरची तपासणी करण्यात आली. दोन्ही मीटर स्लो चाललेले आढळून आले. त्यामुळे विद्युत कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी मीटर जप्त करताना सोनवणे व जाधव यांनी विरोध केला. महावितरणच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना अरोरावी व शिवीगाळ करत बघून घेण्याची धमकी दिली आणि शासकीय कामात अडथळा आणला. त्यानंतर महावितरणच्या पथकाने पुंडलिकनगर पोलिस ठाणे गाठून रीतसर तक्रार दिली. अतिरिक्त कार्यकारी अभियंता संतोष अधिकार यांच्या फिर्यादीवरून वीज वापरकर्ते एल. डी. सोनवणे व गणेश विष्णू जाधव यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# लघु उद्योजकांसाठी पुरस्कार; ३० ऑक्टोबरपर्यंत अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – राज्य शासनातर्फे उत्कृष्ट लघुउद्योग घटकांची निवड करून जिल्हा पुरस्काराने गौरविण्यात येते. सन २०२६ यावर्षासाठी उत्कृष्ट लघुउद्योग जिल्हा पुरस्कार योजनेअंतर्गत पात्र लघुउद्योजकांकडून दि. ३० ऑक्टोबर पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत, असे जिल्हा उद्योग केंद्राच्या उप आयुक्त करुणा खरात यांनी कळविले आहे.

**पात्रतेचे निकष:–** महाराष्ट्र शासनाच्या उद्योग आयुक्तालयांतर्गत जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ही पुरस्कार योजना राबविण्यात येते. सन २०२६ च्या पुरस्कारासाठी दि. १ जानेवारी २०२६ पूर्वी स्थायी लघुउद्योग नोंदणी अथवा उद्यम नोंदणी झालेला आणि मागील दोन वर्षांपासून सलग उत्पादनात असलेला लघुउद्योग घटक पात्र राहील. तसेच संबंधित उद्योग घटक कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

**पुरस्काराचे स्वरुप :–** या पुरस्कारांतर्गत प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास शाल, श्रीफळ व १५ हजार रुपये, तर द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास शाल, श्रीफळ व १० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

**आवश्यक कागदपत्रे :–** इच्छुक उद्योजकांनी फोटोसह विहित नमुन्यातील अर्ज, उद्यम नोंदणी प्रमाणपत्र, मागील पाच वर्षांतील गुंतवणूक, रोजगार, उत्पादन व वर्षनिहाय नफ्याची माहिती, मागील तीन वर्षांचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच कर्ज खाते नियमित असल्याबाबत संबंधित बँकेचे पत्र आदी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३० ऑक्टोबर, मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अधिक माहिती व अर्जाच्या नमुन्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, माहिती तंत्रज्ञान इमारत, दुसरा मजला, गरवारे स्टेडियमजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या उप आयुक्त करुणा खरात यांनी केले आहे.

# पत्रकारांच्या एस.टी. प्रवास सवलतीवर गदा; 'व्हॉईस ऑफ मीडिया आंदोलनाच्या तयारीत

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अर्थात एस.टी.च्या तिकीट मशीनमधून अधिस्वीकृतिधारक पत्रकारांसाठी असलेला प्रवास सवलतीचा पर्याय बंद करण्यात आल्याने राज्यातील पत्रकार बांधवांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. पत्रकारांसाठी पर्यायी राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड मिळण्यास जवळपास दोन महिन्यांचा कालावधी लागणार असताना, तोपर्यंत पत्रकारांनी पूर्ण तिकीट काढून प्रवास करायचा का, असा थेट आणि धारदार सवाल व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम आंतरराष्ट्रीय फोरमने महाराष्ट्राचे परिवहन मंत्री मा. प्रताप सरनाईक तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांना केला आहे.

व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम आंतरराष्ट्रीय फोरमच्या वतीने या संदर्भात स्वतंत्र निवेदने देण्यात आली असून, एस.टी.च्या सर्व तिकीट मशीनमधील अधिस्वीकृतिधारक पत्रकारांचा सवलतीचा पर्याय तात्काळ पूर्ववत सुरू करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे. सध्या विविध प्रवर्गांसाठी राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड प्रणाली टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येत आहे. मात्र, पत्रकारांना हे कार्ड तातडीने उपलब्ध होणार नसल्याची परिस्थिती आहे. कार्ड काढण्याची प्रक्रिया सुरू होण्यासाठी सुमारे १५ दिवसांचा कालावधी लागणार असून, त्यानंतर कार्ड प्रत्यक्ष मिळण्यासाठी आणखी सुमारे ४५ दिवसांचा कालावधी लागणार आहे. म्हणजेच जवळपास दोन महिने पत्रकारांकडे पर्यायी कार्ड उपलब्ध होणार नाही.

याच पार्श्वभूमीवर व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम आंतरराष्ट्रीय फोरमने प्रशासनाला थेट सवाल केला आहे की, ङ्गकार्ड मिळायला दोन महिने लागणार असतील, तर त्या दोन महिन्यांत अधिस्वीकृतिधारक पत्रकारांनी पूर्ण तिकीट काढून प्रवास करायचा का? एकीकडे एस.टी.च्या तिकीट मशीनमधून पत्रकारांचा सवलतीचा पर्याय बंद करण्यात आला आहे, तर दुसरीकडे पर्यायी कार्ड मिळण्यासाठी जवळपास दोन महिन्यांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे पत्रकारांना प्रत्यक्षात प्रवास सवलतीपासून वंचित ठेवण्याचा हा प्रकार असल्याची तीव्र भावना पत्रकारांमधून व्यक्त होत आहे.

पत्रकारांना बातम्यांचे संकलन, अपघात, नैसर्गिक आपत्ती, सामाजिक प्रश्न, शासनाच्या योजना आणि जनतेच्या समस्या यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यात सातत्याने प्रवास करावा लागतो. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत पत्रकारांसाठी एस.टी. ही अत्यंत महत्त्वाची प्रवास व्यवस्था आहे. अनेक पत्रकार मर्यादित आर्थिक परिस्थितीतही जनतेचा आवाज शासन आणि प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत असतात. अशा परिस्थितीत त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार टाकणे अन्यायकारक असल्याचे व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम आंतरराष्ट्रीय फोरम म्हटले आहे.

व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम आंतरराष्ट्रीय फोरमने स्पष्ट मागणी केली आहे की, जोपर्यंत प्रत्येक पात्र अधिस्वीकृतिधारक पत्रकाराला राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड प्रत्यक्ष मिळत नाही, तोपर्यंत पूर्वीप्रमाणे एस.टी.च्या तिकीट मशीनमधील पत्रकारांचा सवलतीचा पर्याय सुरू ठेवण्यात यावा. पात्र पत्रकारांना प्राधान्याने आणि जलदगतीने कार्ड उपलब्ध करून देण्यात यावे तसेच पत्रकारांच्या प्रवास सवलतीबाबत राज्यातील सर्व आगार, डेपो, विभागीय कार्यालये आणि वाहकांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात. या प्रश्नावर पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींशी तातडीने बैठक घेऊन कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनात आणखी एक महत्त्वाची मागणी करण्यात आली असून, अधिस्वीकृतिधारक पत्रकारांचा प्रवास पास केवळ सर्वसाधारण एस.टी. बसपुरता मर्यादित न ठेवता शिवाई बस तसेच विद्युत बस सेवेतही लागू करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आजच्या काळात महामंडळाकडून आधुनिक आणि जलद प्रवासासाठी शिवाई व विद्युत बस सेवा मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यात आली आहे. पत्रकारांना अनेकदा तातडीच्या बातम्यांसाठी आणि विविध कामांच्या निमित्ताने जलद प्रवास करावा लागतो. त्यामुळे पत्रकारांचा पास केवळ काही विशिष्ट बस सेवांपुरता मर्यादित ठेवणे योग्य नसून, शिवाई आणि विद्युत बससारख्या आधुनिक बस सेवांमध्येही पत्रकारांना समान सुविधा मिळणे आवश्यक असल्याची भूमिका व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम आंतरराष्ट्रीय फोरमने घेतली आहे.

व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम आंतरराष्ट्रीय फोरमने प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, पत्रकारांचा सवलतीचा पर्याय तात्काळ पूर्ववत करण्यात आला नाही आणि पत्रकारांच्या न्याय्य मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला नाही, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. प्रसंगी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संबंधित कार्यालयांसमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

कार्ड द्या; पण तोपर्यंत पत्रकारांची प्रवास सवलत बंद करू नका. पत्रकारांना न्याय द्या, अन्यथा आंदोलन अटळ आहे, अशी ठाम भूमिका व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम आंतरराष्ट्रीय फोरमने घेतली आहे. या निवेदनावर मा. संदीप काळे, संस्थापक व आंतरराष्ट्रीय अध्यक्ष; मा. अनिल म्हस्के, राष्ट्रीय अध्यक्ष आणि मा. विजय चोरडिया, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, कानिप अन्नपूर्णे जिल्हाध्यक्ष संभाजीनगर, किशोर महाजन कार्याध्यक्ष संभाजीनगर यांच्या स्वाक्षऱ्या असून, राज्यातील पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटना संघर्ष करण्यास सज्ज असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीचा महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा

## मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजविणे, मंडप परवानगीसाठी एक खिडकी योजना व विसर्जन व्यवस्थेचा आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी आज महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली गणेशोत्सव पूर्वतयारी बैठक घेण्यात आली.

यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, नगरसेवक ऋषिकेश जयस्वाल, मनपा आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय कोंबडे यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंता, उपअभियंता व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजविणे व पॅचवर्क, सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप उभारणीसाठी तात्पुरत्या परवानग्या देण्यासाठी सुरू करण्यात आलेली एक खिडकी योजना,




विसर्जन विहिरींची स्वच्छता व गाळ काढणे, कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था तसेच नवीन ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

मिरवणूक मार्गावरील पॅचवर्कचे काम सुरू असताना संबंधित वार्ड अभियंत्यांनी प्रत्यक्ष स्थळी पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासावी. काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण होत असल्याची खात्री करूनच ते पूर्णत्वास न्यावे, अशा सूचना महापौर व पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

गणेशोत्सवाशी संबंधित सर्व कामांना आवश्यक प्रशासकीय मान्यता तातडीने पूर्ण करून घेण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

'गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण कराव्यात. मिरवणूक मार्ग, मंडप परवानगी, विसर्जन व्यवस्था, स्वच्छता आणि प्रकाशयोजना याबाबत कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. नागरिक व गणेश मंडळांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे,' असे निर्देश मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी दिले.

विसर्जनाच्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यास विसर्जन प्रक्रिया बाधित होऊ नये, यासाठी जनरेटरची व्यवस्था करून पुरेशी प्रकाशयोजना करण्यात यावी, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

गणेशोत्सव काळात नागरिक, गणेश मंडळे व भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, तसेच उत्सवाची सर्व व्यवस्था नियोजनबद्ध आणि सुरक्षित पद्धतीने पार पडावी, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने व वेळेत कामे पूर्ण करावीत, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या रडारवर बाहेरून येणारे प्रतिबंधित प्लास्टिक

## सार्को ट्रान्सपोर्टमधून १,०८० किलो प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅग जप्त; रु.२५ हजारांचा दंड

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- शहरातील प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापरावर आणि विक्रीवर कारवाई करण्यासोबतच आता शहराबाहेरून छत्रपती संभाजीनगरमध्ये येणाऱ्या प्रतिबंधित प्लास्टिकवरही महानगरपालिकेने लक्ष केंद्रित केले आहे. शहरात येणाऱ्या विविध मार्गांवर गस्त घालून प्रतिबंधित प्लास्टिकची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत सुरू असलेल्या या मोहिमेअंतर्गत सार्को ट्रान्सपोर्ट येथे कारवाई करून शालिमार प्लास्टिकचे मालक नाजीम शेख यांच्या नावाने पाठविण्यात आलेल्या प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅगचा मोठा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईत तब्बल १,०८० किलो प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅग जप्त करण्यात आल्या असून, संबंधितांकडून २५,०००/- दंड वसूल करण्यात आला.

महानगरपालिकेकडून आतापर्यंत शहरातील प्लास्टिक विक्रेते, घाऊक विक्रेते तसेच प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करणाऱ्या नागरिकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे. मात्र, प्रतिबंधित प्लास्टिकचा पुरवठा शहराबाहेरून होत असल्याने आता प्लास्टिक शहरात प्रवेश करण्यापूर्वीच त्यावर कारवाई करण्याची रणनीती महानगरपालिकेने अवलंबली आहे. या माध्यमातून शहरात प्रतिबंधित प्लास्टिकचा पुरवठा करणाऱ्या स्रोतांवरही थेट कारवाई करण्याचा मनपाचा प्रयत्न असून, प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापराला आळा घालण्यासाठी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

ही कारवाई महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशाने आणि उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) नंदकिशोर भोंबे यांच्या नियोजनानुसार करण्यात आली, कारवाईमध्ये नागरिक मित्र पथकाचे देविदास सुसर, विष्णू काकडे, मच्छिंद्र वाघ, कैलास भोसले, कैलास सोनवणे, बाबुराव सपकाळ तसेच जवान आनंद चावरीया यांनी सहभाग घेतला.

महानगरपालिकेने नागरिक, व्यापारी आणि प्लास्टिक विक्रेत्यांना प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर, विक्री व साठवणूक टाळण्याचे आवाहन केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# विभागीय लोकशाही दिन मंगळवारी १५ सप्टेंबर रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- प्रत्येक महिन्यातील दुसऱ्या सोमवारी नियमितपणे विभागीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. परंतू या महिन्यातील दुसऱ्या सोमवारी (१४) रोजी गणेश चतुर्थी निमित्त सुट्टी असल्याने त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस मंगळवारी, १५ सप्टेंबर २०२६ रोजी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११.०० वाजता होणाऱ्या या लोकशाही दिनात जिल्हास्तरावर न सुटलेल्या तसेच तक्रारदारांचे समाधान न झालेल्या प्रश्नांवर सुनावणी करण्यात येणार आहे.

तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्वीकारण्यात येणार आहेत.

अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही. जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# एस.आय.आर. कार्यवाहीतून थोडी उसंत मिळाल्यावर महानगरपालिकेची पुन्हा कर वसूली कार्यवाही

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- एस.आय.आर. कामात अडकल्यामुळे झोन कार्यालयांची मालमत्ता कर वसूली काही दिवसांपासून मागे पडली होती. परंतू आज दिनांक ०३.०९.२०२६ रोजी मनपा आयुक्त श्री अमोल येडगे यांनी आदेशीत केल्यावरून अतिरिक्त आयुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे व उप आयुक्त (कर निर्धारक व संकलक) श्री विकास नवाळे यांच्या सुचनेनुसार सर्व झोन कार्यालयांनी मोठ्या थकबाकीदारांची मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही केली. यात झोन १ मधे तीन मालमत्ता सील करून रु. २.५६ लाख तर झोन २ मधे तीन मालमत्ता सील करून रु.३.०६ लाख रुपये कर वसूल करण्यात आला. झोन ४ मधे ३ मालमत्ता सील, झोन ६ मधे २ मालमत्ता सील, झोन ७ मधे १ मालमत्ता सील तर झोन ९ मधे १ मालमत्ता सील करून रु. २.०१ लाख एवढा कर वसूल करण्यात आला. महानगरपालिकेच्या पथकांनी आज दिवसभरात जवळपास ४०.०० लाख एवढा मालमत्ताकर वसूल केला. यापुढे दर गुरुवार व शुक्रवारी थकबाकीदार मालमत्ताधारकांवर अशाच प्रकारे जप्तीची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांनी त्वरीत थकित कर भरून अप्रीय कार्यवाही टाळावी असे आवाहन मनपा आयुक्त श्री अमोल येडगे यांनी केले आहे.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठा क्रांती मोर्च्याच्या 'रास्ता रोको'ने बीड, सोलापूरकडे जाणारी वाहतूक ठप्प

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण सह अन्य विविध मागण्यांसाठी मनोज जरंगे पाटील अंतरवाली येथे पाच दिवसापासून उपोषण करत आहेत. त्यांची प्रकृती खालावली असल्याने शासनाने मराठा समाजाच्या मागण्या तातडीने मान्य करून त्यांचे उपोषण सोडवावे या मागणीसाठी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने झाल्टा फाटा येथे गुरुवारी सकाळी ११:३० ते १२:३० वाजेपर्यंत रास्ता रोको केला. या आंदोलनामुळे तिन्ही बाजूच्या वाहतूक ठप्प झाले आहे.

मराठा आरक्षण लढायचे नेते मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला ओबीसी आरक्षण द्यावे या प्रमुख मागणी सह अन्य विविध मागण्यासाठी आंतरवाली सराटी येथे २९ ऑगस्ट पासून उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणामुळेत्यांची प्रकृती खालावली आहे. सहा दिवस होत आहे. मात्र सरकारकडून उपोषण सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न झाले नाही.

या आंदोलनामुळे मराठा समाज एकवटला असून राज्यात ठीक ठिकाणी आंदोलन सुरू झाले आहेत. आज छत्रपती संभाजी नगर येथील मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने झालता फाटा येथे रस्ता रोको करण्यात आला. एक मराठा लाख मराठा, मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, आरक्षण आमच्या हक्काचे नाही कोणाच्या बापाचे, विखे पाटील हाय हाय अशा जोरदार घोषणा आंदोलकांनी देत झाल्टा फाटा परिसर दणाणून सोडला.

वाहतूक रोखून धरली. या आंदोलनामुळे सोलापूरकडून शहरात येणारी तसेच शहरांकडून बीड, सोलापूर कडे जाणारी वाहतूक ठप्प झाली. बायपास कडे जाणारी वाहतूक थांबली होती.

मराठा क्रांती मोर्चाच्या रास्ता रोको आंदोलनामुळे झाल्टा फाटा येथे तीन रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# ॲड. ऋषिकेश दिलीपराव धाट शिंदे गटात, खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले बालवयापासून कट्टर शिवसैनिक अशी ओळख असलेले ॲड. ऋषिकेश दिलीपराव धाट यांनी १ सप्टेंबर रोजी मुंबई येथील नंदनवन निवासस्थानी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नंदनवन निवासस्थानी खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या हस्ते ॲड. ऋषिकेश धाट यांचा पक्षप्रवेश झाला.

यावेळी खासदार संदिपान भुमरे साहेब, पालकमंत्री संजय शिरसाट साहेब, माजी मंत्री अब्दुल सत्तार साहेब, आमदार विलास बापू भुमरे, संपर्कप्रमुख विलास पारकर, तालुकाप्रमुख दिलीपजी निरफळ, शहरप्रमुख बाबा कराळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

ॲड. ऋषिकेश धाट यांच्या कुटुंबाची शिवसेनेशी जुनी नाळ असून, त्यांचे वडील दिलीपराव धाट यांनी जिल्ह्यात शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षविस्तारासाठी अग्रभागी राहून काम केले आहे. शिवसेनेच्या विविध आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेताना त्यांनी अनेक वेळा लाठ्या-काठ्यांचा सामना केला, केसेस अंगावर घेतल्या तसेच तुरुंगवासही भोगला. संघर्षाची ही परंपरा पुढे नेत विद्यार्थी दशेपासुन ॲड. ऋषिकेश धाट यांनीही सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रियपणे काम सुरू ठेवले आहे. ॲड. ऋषिकेश धाट यांनी सामाजिक प्रश्न, सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी आणि युवकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविला आहे. कायद्याचे ज्ञान, सामाजिक कार्याचा अनुभव आणि आक्रमक कार्यपद्धती यामुळे त्यांनी अल्पावधीतच तरुण कार्यकर्त्यांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पक्षप्रवेशानंतर बोलताना ॲड. ऋषिकेश धाट यांनी शिवसेनेचे विचार, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी



संघर्ष आणि कार्यकर्त्यांचा सन्मान या त्रिसूत्रीवर आगामी काळात अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

'संघर्षाची भूमिका कधीच बदलणार नाही; हिंदुत्वाच्या विचाराशी ठाम राहून सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी अधिक आक्रमकपणे काम करू पक्ष देईल ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली जाईल,' असा निर्धार ॲड. ऋषिकेश धाट यांनी व्यक्त केला. ॲड. ऋषिकेश धाट यांच्या शिवसेना प्रवेशामुळे गंगापूर तालुक्यात पक्ष संघटनेला नवी ताकद मिळणार असून युवा कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वीज कर्मचाऱ्यांना जिवे मारण्याची धमकी; मीटर हिसकावत गोंधळ घालणाऱ्या दांपत्यावर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- थकबाकीसाठी वीजपुरवठा खंडित करणाऱ्या महावितरण कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, जिवे मारण्याची धमकी तसेच मीटर हिसकावून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी नंदनवन कॉलनीतील एका दांपत्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

महावितरणच्या छावणी शाखेचे वरिष्ठ तंत्रज्ञ प्रदीप नाडे हे गुरुवारी थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यासाठी प्रधान तंत्रज्ञ विलास कोरडे नंदनवन कॉलनीत गेले होते. साईसाक्ष रेसिडेन्सीमधील मीना सुभाष पाटोळे यांच्या नावे मागील ७० दिवसांची २२ हजार ९८५ रुपये थकबाकी असल्याने त्यांना बिल भरण्यास सांगितले. वीज कर्मचाऱ्यांनी त्यांना आठ दिवसांपूर्वीही सूचना दिली होती.

परंतु त्यांनी बिल न भरल्याने या ग्राहकाचा वीजपुरवठा खंडित करून मीटर काढण्यात आले. मात्र त्यावेळी मीना पाटोळे व त्यांचे पती सुभाष पाटोळे यांनी कर्मचाऱ्यांनी काढलेले मीटर त्यांचया हातातून हिसकावून घेतले. 'विनाकारण तुम्ही आमच्या घरातील मीटर कसे काढले' असे म्हणत वीज कर्मचारी नाडे व कोरडे यांना शिवीगाळ केली. हे मीटर नेऊन स्मार्ट मीटर बसवून देऊ, असे वीज कर्मचारी समजावून सांगत असताना सुभाष पाटोळे याने नाडे यांची कॉलर पकडली. 'तू मीटर कसे काय घेऊन जातो. तुला जिवंत सोडत नाही', असे म्हणत हाताचापटाने मारहाण करून सरकारी कामात अडथळा आणला. नाडे यांनी डायल ११२ ला मदतीसाठी कॉल केल्यावर काही वेळाने पोलिस आले. त्यानंतर पाटोळेस पोलिस ठाण्यात घेऊन गेले.

या प्रकरणी वरिष्ठ तंत्रज्ञ प्रदीप नाडे यांच्या फिर्यादीवरून मीना पाटोळे व सुभाष पाटोळे या दोघांवर छावणी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

(पान १ वरुन)

## सीजेपीमध्ये फूट, अहमदाबादच्या...

कोणीही हुकूमशहा किंवा राजा बनून निर्णय घेणार नाही. परंतु ही मागणी फेटाळून लावून मनमानी कारभार सुरू करण्यात आला, असे त्यांनी स्पष्ट केले.

अरविंद केजरीवाल यांच्यावर जोरदार हल्लाबोल करताना ब्रह्मभट्ट म्हणाले, ''ही टीम बनवण्याची मूळ कल्पना अरविंद केजरीवाल यांचीच होती. ते सुरुवातीपासूनच फसवणूक करत आले आहेत. जेव्हा अण्णा हजारे यांचे आंदोलन सुरू झाले, तेव्हा त्यांनी अण्णांचा वापर करून स्वतःचा राजकीय फायदा करून घेतला.''

## बार कौन्सिल ऑफ इंडियाला...

हैदराबादच्या विधी विद्यापीठ, नालसारच्या वादावरून बार कौन्सिल ऑफ इंडियाला (बीसीआय) फटकारले. सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, विद्यार्थ्यांचा निर्णय चुकीचा असला किंवा त्यांना चुकीचा सल्ला दिला गेला असला तरीही, त्यांना आपली मते व्यक्त करण्याचा आणि निषेध करण्याचा अधिकार आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी बीसीआयच्या त्या परिपत्रकावरही नाराजी व्यक्त केली, ज्याद्वारे नालसारच्या २०२६ च्या विधी पदवीधरांच्या वकील म्हणून होणाऱ्या नावनोंदणीला स्थगिती देण्यात आली होती. सरन्यायाधीश म्हणाले, ''हा माझ्या आणि विद्यार्थ्यांमधील प्रश्न आहे. याचा मुद्दा बनवण्याची काहीच गरज नव्हती. यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार बार कौन्सिलला कोणाचा?'' असे सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले.

## सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट...

समोर आलेल्या एका व्हिडिओमध्ये आरोपी संतोष चव्हाणने डीजे आणि साऊंड सिस्टीमच्या बाजूने भूमिका मांडली होती. आरोपी म्हणाला, ''पुण्यात सुमारे ४ हजार लहान-मोठी मंडळे असून उत्सवात कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. ७०० मंडळांनी जरी साऊंड सिस्टीम लावली नाही, तर जनरेटर, लाइट, ट्रॅक्टर-ट्रॉली, हमाल आणि साऊंड ऑपरेटर अशा ८ हजार कष्टकऱ्यांच्या घरातील चूल बंद पडेल.''

''निवडणुका, प्रचार आणि कोविड संकटात मंडळांचे कार्यकर्ते धावून जातात; मात्र सणांवर बंधने येतात तेव्हा पुण्यातील लोकप्रतिनिधी मंडळांच्या बाजूने ठाम उभे राहत नाहीत. मर्यादा पाळून साऊंड सिस्टिम चालवण्यास परवानगी हवी,'' असा युक्तिवाद त्याने मांडला होता.

या घटनेनंतर पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला आहे. ''विद्यानंद बापट यांच्यावरील हल्ला अत्यंत निंदनीय आहे. लोकशाहीत प्रत्येकाला स्वतःचे मत मांडण्याचा घटनादत्त अधिकार आहे. कोणीही कायदा हातात घेऊन लक्ष्मणरेषा ओलांडल्यास त्याच्यावर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल असे ते म्हणाले.

## राज्य सरकार सर्वसामान्यांचे प्रश्न...

आणि सरकारकडून केवळ थातूरमातूर आणि टोलवाटोलवीची उत्तरे दिली जात आहेत.''

''दुर्दैवाने या सरकारला लोकांच्या पोटापाण्याच्या प्रश्नांपेक्षा कोण शाकाहारी खातो आणि कोण मांसाहारी, यावरच राजकारण करण्यात जास्त रस आहे. कोणी उपाशीपोटी मरत असेल तर भाजप आणि सरकारला त्याचा काहीही फरक पडत नाही,'' असा संताप त्यांनी व्यक्त केला. या आंदोलनाला शिवसेना (उबाठा) पक्षाचा पूर्ण पाठिंबा असून, याप्रश्नी आपण काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याशीही चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्यातील घडामोडींवर आदित्य ठाकरे यांनी तीव्र प्रतिक्रिया नोंदवली, ''डीजे आणि ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका घेणारे विद्यानंद बापट हे कोणत्याही सणाच्या किंवा धर्माच्या विरोधात बोलत नाहीत. आवाजाची मर्यादा काय असावी, यावर चर्चा सुरू असताना अशा प्रकारे भरदिवसा मारहाण होणे हे राज्यातील कोलमडलेल्या कायदा-सुव्यवस्थेचे लक्षण आहे असे आदित्य ठाकरे म्हणाले.

## अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या गुड न्यूजवर नाना पटोले यांनी जोरदार टीका केली. ''पंतप्रधानांनी सोशल मीडियावर जीडीपी वाढल्याचा आनंद व्यक्त केला, पण देशभरातील आघाडीच्या अर्थतज्ज्ञांनीच या दाव्यांची पोलखोल करत त्यांना ट्रोल केले आहे.''

''जर भारताचा जीडीपी ७.८ टक्के इतका प्रचंड वाढला असेल आणि जागतिक पातळीवर देश अव्वल ठरत असेल, तर देशात महागाई का वाढत आहे? बेरोजगारी का संपलेली नाही? शेतकरी आत्महत्या का करत आहेत? जर अर्थव्यवस्था इतकी बळकट झाली असती, तर देशात सगळीकडे आलबेल वातावरण असायला हवे होते. जनतेसमोर खोटे आकडे फेकून दिशाभूल केली जात आहे,'' असा थेट निशाणा पटोले यांनी साधला.

## पाकिस्तानात १०० वर्षांहून...

आलेले अपयश आणि तेथील प्रशासनाची उदासीनता अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे. पाकिस्तानात अल्पसंख्याक समाज आजही किती असुरक्षित आहे आणि त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर तसेच प्रार्थनास्थळांवर कशा प्रकारे गदा आणली जात आहे, हेच या घटनेवरून पुन्हा एकदा उघड झाले आहे.''

भारताने पाकिस्तान सरकारला त्यांच्या वैधानिक आणि नैतिक जबाबदाऱ्यांची आठवण करून दिली आहे. पाकिस्तानने या प्रकरणाची त्वरित चौकशी करून गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा सुनावली पाहिजे; त्याचबरोबर, विटंबना झालेल्या या ऐतिहासिक मंदिराची त्वरित डागडुजी करून ते पूर्ववत करावे, अशी आक्रमक मागणी भारताने केली आहे.

# पाणी आणण्यासाठी गेलेल्या तरुणाचा अपघाती मृत्यू; एअर व्हॉल्व्हवर पाणी भरताना ट्रकची धडक

पैठण दि.३ (प्रतिनिधी)- पैठण तालुक्यातील थेरगाव येथे पाणीटंचाईचे भीषण वास्तव समोर आले आहे. गावातील पाणीटंचाईमुळे गळक्या जलवाहिनीच्या एअर व्हॉल्व्हवर पाणी भरण्यासाठी गेलेल्या ३५ वर्षीय तरुणाचा मालवाहतूक ट्रकच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. ३) सकाळी घडली. या घटनेमुळे थेरगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पाणीटंचाईचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

थेरगावची लोकसंख्या सुमारे पाच हजार असून, गावातील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. तहान भागविण्यासाठी ग्रामस्थांना विविध ठिकाणी भटकंती करावी लागत आहे. पैठण धरणातून जालन्याकडे जाणारी पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी थेरगाव परिसरातून गेली आहे. या जलवाहिनीवरील गळक्या एअर व्हॉल्व्हमधून पाणी येत असल्याने गावातील महिला व नागरिक दररोज तेथे पाणी भरण्यासाठी गर्दी करतात.

गुरुवारी सकाळी दयानंद दानियल आहेर (वय ३५, रा. थेरगाव, ता. पैठण) हे पाणी भरण्यासाठी जलवाहिनीवरील गळक्या एअर व्हॉल्व्हजवळ गेले होते. त्याचवेळी पैठणकडून येणाऱ्या मालवाहतूक ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात आहेर गंभीर जखमी झाले.

ग्रामस्थांनी त्यांना तातडीने पाचोड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. बाबासाहेब घुगे आणि डॉ. प्रकाश साबळे यांनी त्यांच्यावर प्रथमोपचार केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारांसाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला. तेथे उपचार सुरू असताना दयानंद आहेर यांचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी पाचोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपोनि सचिन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली स. फौ. गव्हाणे पुढील तपास करीत आहेत.

थेरगावमध्ये पाणीटंचाई असल्याने गेल्या काही दिवसांपासून पंचायत समिती विभागाच्या माध्यमातून पाण्याचे टँकर सुरू होते. मात्र, ३१ ऑगस्टपासून हे टँकर बंद करण्यात आल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली. त्यामुळे नागरिकांसमोरील पाण्याचे संकट अधिक तीव्र झाले असून, प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.